# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- १५८-२२ दिनांक :- ०१/०६/२०२२

## दुचाकी वाहने व रिक्षा चोरी करणाऱ्या सराईत आरोपीतांना गजाआड करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि.२१/०५/२०२२ रोजी २२.००वा. ते दि. २२/०५/२०२२ रोजी ०८.००वा. चे दरम्यान कमलाकर चाळ, शनिमंदिराचे मागे, तुंगारेश्वर मंदिर रोड, तुंगार फाटा, वसई (पु.), ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी यानी त्यांची होंडा ॲक्टीव्हा मोटर सायकल क्रं.एम.एच.०४/ई.जी.४८६९ ही उभी करुन ठेवलेली असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी श्री. अनुपम रामदुलार यादव, वय-३५ वर्षे, रा. शनि मंदिराचे मागे, तुंगारफाटा, वसई(पु.), ता. वसई, जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांवर पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ४४४/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे दि.२२/०५/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळास भेट देवून व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपी नामे. १) रोहितकुमार गौड, वय-२१ वर्षे, २) विनयकुमार पटेल, वय-१९ वर्षे, ३) सौरभ यादव, वय-२२ वर्षे, ४) रितेश जंजाळे, वय-१९ वर्षे, सर्व रा.वसई (पु.), ता. वसई, जि. पालघर यांना दि.३०/०५/२०२२ रोजी अटक करुन त्यांचेकडून एक ऑटो रिक्षा, ०७ मोटार सायकल असा एकुण- २,२५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कायदा कलम |
|---|---|---|
| १ | पेल्हार | गु.रजि.नं. I ४४४/२०२२, भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे, (मुळ गुन्हा) |
| २ | पेल्हार | गु.रजि.नं. I ३६९/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे, |
| ३ | पेल्हार | गु.रजि.नं. I ४६०/२०२२, भा.दं.वि.सं. कलम-३७९ प्रमाणे, |
| ४ | वालीव | गु.रजि.नं. I ४२३/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९, प्रमाणे, |
| ५ | वालीव | गु.रजि.नं. I ५५०/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९, प्रमाणे, |
| ६ | वालीव | गु.रजि.नं. I ५५२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३९४, ३४ प्रमाणे, |
| ७ | माणिकपुर | गु.रजि.नं. I १८५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे, |
| ८ | माणिकपुर | गु.रजि.नं. I १९०/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे, |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. अमर मराठे, पोलीस निरीक्षक (प्रशासन), व पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.